ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील शैक्षणिक विचार: एक दृष्टिक्षेप

**मनिषा उमाजी बटवाल (कोल्हे)**

मराठी साहित्यविश्वातील एक सिद्धहस्त लेखक ह. मो. मराठे यांचे साहित्यातील योगदान खूप मोलाचे आहे. समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्म, शिक्षण असे विविध विषय आपल्या लेखनीने समृद्ध केलेले आहेत. मराठ्यांच्या कथा–कादंबऱ्यांच्या आधारे त्यांचे शैक्षणिक विचार समजून घेणे येथे अभिप्रेत आहे.

शिक्षणाने माणसाला सुशिक्षितपणा, सुसंस्कृतपणा येतो. शिक्षणाने व्यक्तीला ज्ञान, मनोरंजन, माहिती, मान–सन्मान, पैसा, पद, प्रतिष्ठा तर मिळतेच परंतु उपजीविकेचे साधन मिळविण्यासाठी दैनंदिन व्यवहार पूर्ण करण्यासाठी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे ठरते. शिक्षणामुळेच क्षणात जगाच्या कानाकोपऱ्यातील माहिती ज्ञात करुन घेता येते. दैनंदिन व्यवहार सुरळीत पार पाडणे, सर्वांचा विश्वास संपादन करणे, नोकरी–व्यवसाय करणे, आर्थिक स्थैर्य मिळविणे, पद–पैसा–प्रतिष्ठा मिळविणे यांसारख्या गोष्टी शिक्षणामुळेच सहजसाध्य होतात. म्हणून शिक्षणाला अत्यंत महत्त्व आहे.

## ह. मो. मराठे यांच्या कथांमधील शैक्षणिक विचारांचा परामर्श.

**१. पक्षिणी: (पक्षिणी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, १९९७):** या कथासंग्रहातील 'मी थोडासा अश्वत्थामा' या कथेतील नायक प्रथम श्रेणीत पास होऊन आपले शिक्षण पूर्ण करतो. नोकरी मिळविताना मात्र या नायकाला वशिला नसल्याने शिक्षण असूनही नोकरी मिळत नाही. एम.ए. पर्यंत शिक्षण झालेले असूनही प्रोफेसरची नोकरी न मिळाल्याने कारकुनीच करावी लागणार असल्याचा निराशावाद नायकाच्या मनात घर करतो. एम.ए.चे शिक्षण घेत असताना नायकाचे वडील नायकाला शिक्षण बंद करुन नोकरी शोधण्याचा आग्रह धरतात तेव्हा नोकरी मिळत नसताना घरच्यांचा नोकरीसाठी आग्रह धरण्यामुळे नायकाचे शिक्षणातही लक्ष लागत नाही.त्यामुळेच हा नायक इकडे तिकडे चकाट्या पिटतो, विड्या ओढतो आणि नाईलाजाने मनाविरुद्ध वर्गात बसतो. (पृ.४२,४३)

या कथेच्या माध्यमातून मराठे यांनी शिक्षण असूनही नोकरी न मिळणे, वशिलेबाजी, नैराश्यातून येणारी व्यसनाधिनता, पोट भरण्यासाठी नुसते शिक्षण असून चालत नाही तर गरजेपुरती नोकरीसुद्धा असावी असा मनोदय व्यक्त केलेला दिसून येतो. 'पक्षिणी' या कथासंग्रहातील दुसरी कथा 'विरुप'. या कथेतील नायक बागुलचे बी.एस्सी. सेकंड क्लास, केमिस्ट्री ऑनर्स असे शिक्षण झालेले असते. घरातील हलाखीची परिस्थिती असताना तो शिक्षण घेतो, परंतु शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नाही त्यामुळे पोटसुद्धा भरता येत नाही. पोटापाण्याची व्यवस्था करण्यासाठी रिक्षा चालवायचे ठरवितो पण बँकेतून लोन घेण्यासाठीसुद्धा वशिला लावावा लागतो, ही गोष्ट मात्र नायकाला खटकते. एवढे शिक्षण घेऊनही रिक्षावाल्याचा युनिफॉर्म घालून रहावे लागणे बागूलला लज्जास्पद वाटते. (पृ.८२) या कथानकामागे एकीकडे उच्च शिक्षणाचा आलेख तर दुसरीकडे साधी राहणी आणि मनाविरुद्ध काम वाट्याला येते असे दिसते. शिक्षणाच्या दर्जानुसार व्यक्तीला काम न मिळणे ही शोकांतिका येथे अधोरेखित होते.

**२. इतिहासातील एक अज्ञात दिवस: (इतिहासातील एक अज्ञात दिवस, पारस पब्लिकेशन्स, कोल्हापूर, २००९):** या कथासंग्रहातील अयोध्या या कथेतील सुमन आणि सुहास साठे या उभयतांमध्ये त्यांचा मुलगा अनिलच्या शाळेत घालण्याविषयी मतभेद असतात. सुहास साठे

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

अनिलला मराठी माध्यमातून शिक्षण देण्याविषयी आग्रही भूमिका घेतो तर सुमन साठे अनिलला इंग्लिश मिडियममध्ये शाळेत घालण्याविषयी आग्रही राहते. सुहास अनिलला मातृभाषेतून अधिक सहजतेने शिक्षण घेता यावे म्हणून मराठी माध्यमाच्या शाळेत घालतो. अनिलवर शिक्षणाचे चांगले आचार–विचारांचे संस्कार होतात. दहावी–बारावीला तो पहिल्या नंबराने मेरिटमध्ये येतो. इतर ॲक्टिव्हिटीजमध्येही तो सक्रिय सहभाग घेतो. शिक्षणामुळे अनिल सर्वगुणसंपन्न, सुसंस्कारी नागरिक होऊन उच्चपदाची नोकरी, घर, गाडी, प्रतिष्ठा सर्व काही प्राप्त करेल अशी आशा त्याच्या आईवडिलांना असते. (पृ.१७४,१७५,१७७) शिक्षणानेच माणूस घडतो, सुसंस्कारी नागरिक बनत असल्याचे सुतोवाच मराठे येथे करताना दिसतात.

**ह. मो. मराठे यांच्या कादंबऱ्यांमधील शैक्षणिक विचार:**

**१. निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी: (निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९७२):**

या कादंबरीतील नायक एम.ए. तर नायिका म्हणजेच ‘वसू’ बी.ए. झालेली आहे. दोघेही नोकरी करुन आर्थिक स्थैर्यता प्राप्त करण्याच्या विचारात असतात. पैसा कमवून जीवनावश्यक गरजा, मनोरंजन, आनंद मिळविण्यासाठीही ते धडपडत असतात. नोकरी मिळविण्यासाठी शिक्षण आवश्यकच आहे, परंतु प्रामाणिकपणा, स्वावलंबनही तितकेच आवश्यक आहे. (पृ.१५,५५) परंतु बी.ए. झालेल्या ढोणकरच्या अंगी स्वावलंबन, देशप्रेम, प्रामाणिकपणा दिसून येत नाही. शिक्षणाने सर्वांच्याच अंगी सुसंस्कारीतपणा, सुशिक्षीतपणा येतोच असे नाही. दोन मित्रांमधील ही विचारांची तफावत त्यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा वेगवेगळा दृष्टिकोन सूचित करते. (पृ.५६)

शिक्षणसंस्थेचा सेक्रेटरी शिक्षणक्षेत्रासारख्या पवित्र क्षेत्राचा वापर विधायक पद्धतीने न करता त्यामध्ये भ्रष्टाचार करुन शिक्षणाचे पावित्र्य सेक्रेटरीसारखे लोकच धोक्यात आणत असल्याचे चित्र ह. मो. मराठे यांनी परिणामकारकपणे समोर आणले आहे. (पृ.७५,७६) भ्रष्टाचाराची पाळेमुळे शिक्षणक्षेत्रातही किती खोलवर रुजली आहेत याचेच हे निदर्शक असल्याचे दिसून येते.

उच्च शिक्षण प्राप्त करुनही बेकारीच्या समस्येवर भाष्य करताना डॉ. अजित मगदुम म्हणतात,

‘‘नायकाला राहून राहून हाच पेच आहे की, आपल्यासारख्या पदवीधर जोडप्याला (त्या काळात पदवीधरला अधिक महत्त्व होतं) कुठेही उदरनिर्वाहापुरतं काम मिळू नये. पदवीपर्यंतच शिक्षण घेऊनही बेकारी? असे किती पदवीधर बेकार असतील? या घनघोर बेकारीतून राष्ट्र कसे घडणार? सुशिक्षीतांची ही अवस्था तर निरक्षरांचं काय? तारुण्यसुलभ भावभावनांचं काय? ही तरुण पिढी वैफल्यग्रस्त होऊन कुमार्गाला लागली तर कोण त्यांना आवरणार? असे चक्रावून टाकणारे प्रश्नही जाता–जाता यातून उपस्थित होतात’’.१

शिक्षण घेऊनही भेडसावणाऱ्या समस्यांवर डॉ. अजित मगदुम यांनी उचित भाष्य केले आहे. कादंबरी निर्मितीच्या काळात तरुणांना शिक्षण घेऊनही समाजव्यवस्थेमुळे नोकरी मिळविण्यात आणि स्वत:ची प्रगती करण्यात जे अडथळे ठरत होते त्यावर भाष्य करताना गणेश दिघे म्हणतात,

‘‘स्वातंत्र्यानंतर आलेल्या नेहरुंच्या पहिल्या सरकारने जनतेसमोर स्वप्नांचा अक्षरक्ष: पाऊसा पाडला. व्यक्तिविकासाच्या योजना सुरु केल्या. मात्र अल्पावधीतच ह्या सुंदर फुग्यांमधली हवा निघून गेली. पुढे राजकीय नीतिमूल्ये, सत्ताकांक्षा, स्पर्धा यांतून राष्ट्रीय चारित्र्याचे एक एक नेतृत्व फटाफट उघडं पडत होतं. सरकारी खजिना देशांतर्गत औद्योगिक विकास, दळवळण, रस्ते, पाणी प्रश्न, संरक्षण आणि प्रशासन यंत्रणा उभारणीत रिकामा होत होता. नोकरशाहीला थेट उद्दिष्ट नव्हतं आणि सार्वजनिक हितासाठीच्या गंगाजळीलाही गळती लागलेली, त्यामुळे दाखविलेली स्वप्नं आणि वास्तव यांच्यात दरी निर्माण झाली आणि भ्रमनिरासाचं भलं मोठ्ठं खापर मात्र जनतेच्या कपाळी आलं. औद्योगिक आणि सेवासंस्थांचा अल्प विकास होऊनही वाढीव लोकसंख्येस आळा घालण्यास सरकारे असमर्थ ठरली आणि बेकारीचा प्रश्न पुढं आला. पुरेसे शिक्षण घेऊनही त्याचा उपयोग होत

ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

नाही. मुळातच राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात नीतिमूल्यांची झालेली घसरण पुढच्या काळातील अपेक्षांच्या गळतीस कारणीभूत झाली''.[२]

फक्त पुरेसे शिक्षण घेऊनही सर्वसामान्य माणसांच्या सर्व प्रश्नांना उत्तर मिळेलच असे नाही याची शाश्वती नसल्याचे भाष्य येथे दिघे करताना दिसतात.

**२. काळेशार पाणी: (काळेशार पाणी, निलकंठ प्रकाशन, पुणे, १९७२):**

या कादंबरीतील 'सामंत' नावाचा विद्यार्थी हुशार आणि इतरांपेक्षा वेगळा व उठावदार दिसतो. त्याचे वर्गातील उत्तरे देणे, खेळामध्ये सक्रिय सहभाग घेणे हा सर्वांगीण विकासाचा एक टप्पा दिसून येतो. शिक्षणाने ज्ञानाबरोबरच संस्कारही घडले जातात. वागण्या–बोलण्याचे अचूक संवाद साधण्याचे कौशल्यही शिक्षणाने विकसित होते. (पृ.५,८,१२,३२) हेच मराठे येथे अधोरेखित करतात. विद्यार्थीदशेत विद्यार्थ्यांनी अभ्यास करुन ज्ञानग्रहण केले पाहिजे. ज्ञानार्जनाबरोबरच शरीरस्वास्थ्य, कला, क्रीडा, वक्तृत्व इ. गुणांचा विकास करणे म्हणजे शिक्षण. शिक्षणाने येणारे सुसंस्कृतपण हेच शिक्षणाचे खरे उद्दिष्ट असले पाहिजे.

**ह. मो. मराठे यांच्या कथांमधील शैक्षणिक विचार:**

**३. इतिवृत्त: (इतिवृत्त, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९८२):**

वृत्तपत्रीय क्षेत्रातील शिक्षण श्रीरंग नाडकर्णी यांना पत्रकार–संपादक पदाबरोबरच पैसा, प्रतिष्ठा देताना दिसते. नोकरी करता–करता ते सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, हॉटेल मालक–कामगार यांचे प्रश्न हाताळताना दिसतात. ही सर्व कामे ते शिक्षण आणि अधिकारपद असल्यामुळेच करु शकतात.

शिक्षणामुळे कायदा, सुव्यवस्था, भ्रष्टाचार या सर्वांचे पुरेपूर ज्ञान असल्यामुळे अन्याय, अज्ञान, अत्याचार याविरुद्ध लढता येऊ शकते. शिक्षणाने माणसाला नैतिक जबाबदारी येते. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांमधील फरक शिक्षणाने समजतो. त्यामुळे जुन्या रुढी, परंपरा, अज्ञान, अंधश्रद्धा याना विज्ञानाचा आधार नाही हे सिद्ध झाल्यामुळे वाईट गोष्टींना प्रतिबंध घालतानाचे चित्र समोर येते. (पृ.६८,६९,८७) शिक्षणामुळे व्यक्तीची नैतिक, आर्थिक, आध्यात्मिक, कौटुंबिक, सामाजिक प्रगती चांगली होते हेच येथे स्पष्ट होते.

**४. कुरुक्षेत्र: (कुरुक्षेत्र, सन पब्लिकेशन्स्, पुणे, १९८५):**

डॉ.म्हसकर शांतीवन महाविद्यालयाची स्थापना शिक्षणक्षेत्रात विधायक काम करण्यासाठी करतात. विद्यार्थ्यांनी प्रत्येक क्षेत्रावर आपल्या कर्तबगारीचा स्वतंत्र ठसा उमटवावा असा दृष्टिकोन समोर ठेवून तो विद्यार्थी घडविण्याचा विचार करतात. प्राध्यापकांनी ज्ञानदानाचे पवित्र कार्य करुन कल्पक, कर्तबगार, कार्यक्षम नागरिक घडवून समाजपरिवर्तन घडवून आणावे असा उपदेश ते प्राध्यापकांना करतात. शिक्षण घेतल्याने आणि दिल्यानेच चांगला सुसंस्कृत, एकसंघ, प्रगतीशील समाज तयार होऊ शकतो असा आशावादी दृष्टिकोन डॉ.म्हसकर बाळगतात. (पृ.६) शिक्षणक्षेत्रात काम करुन पैसा कमविणे हा मूळ उद्देश न ठेवता ज्ञानदान करुन आदर्श नागरिक घडविणे असा उदात्त दृष्टिकोन डॉ.म्हसकरांच्या अंगी दिसून येतो.

तुकाराम फराटे शांतीवन महाविद्यालयात आपली सत्ता स्थापन करुन गुंडप्रवृत्तीने, भ्रष्टाचारी वृत्तीने अमाप पैसा मिळवितात. शिक्षणाला बाजारी स्वरुप आणून अनुदान हडप करणे, वेगवेगळया कारणाने सरकारी पैसा मिळविणे, देणग्यांच्या स्वरुपातील पैसा हडप करणे अशी भ्रष्टाचारी कामे करुन या संस्थेत आणि राजकारणातही दहशत माजवितात. डॉ. म्हसकरांनी लावलेल्या शिक्षणाच्या रोपट्याचे तुकाराम फराटे गुंडांचे आश्रयस्थान बनवितात. वेगवेगळ्या मार्गांनी स्वत:ची प्रगती करुन घेऊन सामान्य विद्यार्थी, प्राध्यापक यांना वेठीस धरतात. (पृ.२२,२३,२६,५४, ५९,६३,७२)

तुकाराम फराटे डॉ.म्हसकरांचा खूण करतात. एकाच शिक्षणक्षेत्रातील दोन वेगवेगळ्या प्रवृत्तींचे दर्शन येथे ह. मो. मराठे घडवितात.

याच कादंबरीतील प्रा. उल्हास भावे हे शिक्षणाला पूरक वातावरण तयार करतात. स्वत:बरोबरच विद्यार्थी आणि प्राध्यापक यांना अन्यायाविरुद्ध लढण्यास तयार करतात. चांगले नागरिक घडविण्यासाठी ते विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि मार्गदर्शन करुन आपले योगदान देतात. शिक्षणाने स्वत:बरोबरच समाजाची प्रगती होते याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे प्रा. उल्हास भावे (पृ. १३,२०,७२) असल्याचे प्रत्ययाला येते.

कादंबरीतील उत्तरार्धात पत्नीने डी.एड. करुन मास्तरीण होऊन पैसे कमवून आपल्याला द्यावेत असा दुराग्रह वसंतराव दामले धरतात. सुमाला शारीरिक अडचणी असतानाही ते तिचा शिक्षिका होण्यासाठी छळ करतात. शिक्षणासाठी होणारा खर्च सासरच्या लोकांनी करावा असा मानस ठेवतात. सुमाला शैक्षणिक कार्यात कोणत्याही प्रकारची मदत व प्रोत्साहन न देता उलट पैसे मिळविण्याचे एक माध्यम म्हणून तिच्याकडे पाहतात. (पृ.८२,९१,९२,९४,९५,१०५) वसंतराव दामलेंचे शैक्षणिक विचार शिक्षणक्षेत्राला कलंक वाटतात.

**५. सॉफ्टवेअर: (सॉफ्टवेअर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु.आ. २००७):**

कोकणातील ग्रामीण पार्श्वभूमी लाभलेले व्ही.एस.देशमुख वडिलांच्या मार्गदर्शनामुळे पुण्यात शिक्षणासाठी येतात. वडिलांचा शिक्षणासाठी पाठिंबा आणि स्वत:च्या जिद्दीने ते एम.ए. होतात. शिक्षणाचा उपयोग ज्ञानदानासाठी करतात. प्राध्यापकाची नोकरी सांभाळत इतर शैक्षणिक प्रगतीबरोबरच ते वेगवेगळया विषयावर वर्तमानपत्रे, मासिके यांसाठी लेखन करतात. (पृ. १३,४८,४९) उच्च शिक्षण घेतले तर पद, पैसा, प्रतिष्ठा आपोआप मिळते हे मर्म देखमुखांच्या माध्यमातून मराठे प्रभावीपणे मांडतात. स्वत:बरोबरच कुटुंबाचा आणि समाजाचा शैक्षणिक आणि आर्थिक स्तर देशमुख उंचावताना दिसतात. शिक्षणाने माणसाला सुसंस्काराबरोबर परिपूर्णता येत असल्याचा प्रत्यय येतो.

**समारोप**

ह. मो. मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधून येणारी पात्रे विद्यार्थी, शिक्षक–प्राध्यापक, संस्थाचालक, कंपनी व्यवस्थापक, कंपनी मालक, कामगार अशा विविध भूमिकांमधून येताना दिसतात. ह.मो.मराठे यांनी समाजातील विविध गोष्टींचे सुक्ष्मातिसूक्ष्म निरीक्षण केलेले आहे. त्यामुळे कथा–कादंबऱ्यांच्या माध्यमातून त्यांनी शिक्षणक्षेत्रातील चांगल्या वाईट गोष्टींचा विचार प्रभावीपणे मांडलेला दिसून येतो. ह.मो.मराठे यांच्या कथा–कादंबऱ्यांमधील पात्रांमध्ये शिक्षणक्षेत्राविषयी कमालीचा आदर असणारी तर काही विधायक समाजोपयोगी कार्ये करणारी दिसतात, तर काही पात्रे मात्र शिक्षणाचे बाजारीकरण करुन भ्रष्टाचारास खतपाणी घालणारेही दिसतात. केवळ स्वत:चा स्वार्थ साधण्याच्या हेतूने समाजात विघातक कृत्ये करतानाही दिसतात. पण बहुतांशी पात्रे ही शिक्षणाचा सदुपयोग करणारी आणि सकारात्मक दृष्टीने वागत असल्याने संस्कारशील दिसून येतात.

**संदर्भ:**

१. सारडा शंकर (संपा.), ''काळेशार पाणी: संहिता आणि समीक्षा,'' डिंपल पब्लिकेशन, ठाणे, २००८, पृ. ११६, ११७.
२. तत्रैव, पृ. २२७.